वाहनतळाची जागा रिकामी करा

मुंबई मनपाचे नाट्यनिर्मात्या संघाला आदेश

... तर कारवाई करणार

मुंबई मनपाने नाट्यनिर्मात्या संघाला वाहनतळाची जागा तत्काळ रिकामी करण्याचे निर्देश दिले आहेत. ही जागा रिकामी न केल्यास महानगरपालिकेच्या लागू तरतुदींनुसार पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिशीद्वारे देण्यात आला आहे. कोहिनूर वाहनतळात मराठी नाट्यनिर्मात्यांच्या वाहनांच्या पार्किंगसाठी तसेच वास्तू सेंट्रल बिल्डिंग येथील वाहनतळात नाटकांचे सेट्स व अन्य साहित्य ठेवण्यासाठी परवानगी देता येणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



मुंबई : दादर येथील मनपा वास्तू सेंट्रल बिल्डिंगमधील १०० हून अधिक वाहनांची क्षमता असलेले वाहनतळ जून २०२३ पासून वाहनांच्या पार्किंगसाठी वापरात नसल्याचे उघड झाले आहे. या जागेचा वापर जागतिक मराठी नाट्यधर्मी निर्माता संघाकडून नाटकांचे सेट्स आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी केला जात आहे. आता ही जागा पुन्हा वाहनतळासाठी द्यावी, असे आदेश मुंबई मनपाने दिले आहेत.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत कोविड महामारीच्या अनुषंगाने या वापरास परवानगी देण्यात आली होती. महानगरपालिका आयुक्तांनी एमजीसी/एफ/९९१४ १५ जून २०२३ या संदर्भाने जून २०२४ पर्यंत मंजुरी दिली होती. त्यानंतर जून २०२४ ते जून २०२५ या कालावधीसाठी उपायुक्त (परि. २) यांनी एमडीएफ/७८१, २१ जून २०२४ या संदर्भाने मंजुरी दिली होती.

माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी म्हटले की, "महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाहनतळाचा वापर वाहनांच्या पार्किंगसाठी होणे अपेक्षित आहे. कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या परवानगीचा कालावधी संपल्यानंतरही वाहनतळाची जागा नाटकांचे सेट्स ठेवण्यासाठी वापरली जात असेल, तर त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. एकीकडे दादर परिसरात पार्किंगसाठी जागेची कमतरता असताना महापालिकेचे वाहनतळ वापराबाहेर राहणे योग्य नाही. पालिकेने संबंधित जागा तातडीने रिकामी करून घेऊन वाहनतळ नागरिकांसाठी सुरू करावे. तसेच सार्वजनिक सुविधांचा वापर त्यांच्या मूळ उद्देशानुसार होतो की नाही, यावर नियमित देखरेख ठेवावी."

दादर हे मुंबईतील मध्यवर्ती ठिकाण आहे. येथे खरेदीसाठी हजारो लोक येत असतात. दादर परिसरातील पार्किंगची समस्या लक्षात घेता, महापालिकेने या प्रकरणात तातडीने कार्यवाही करून वाहनतळ पुन्हा नागरिकांच्या सेवेत आणावे, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी केली आहे.

आलिशान प्रवास



मुंबई ते बेंगळुरू दरम्यान वंदे भारत स्लीपर ट्रेन लवकरच चालवण्यात येणार आहे. या सेवेसाठीची १६ डब्यांची ट्रेन सीएसएमटी येथे गुरुवारी दाखल झाली. (छाया : विजय गोहिल)

न्या. भोसले यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाकडून खुली सुनावणी

एमपीएससी परीक्षा घोटाळा प्रकरण

अमित श्रीवास्तव/मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) नऊ परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि गैरप्रकारांची चौकशी करणारा पाच सदस्यीय आयोग पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी खुली सुनावणी घेणार आहे. महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त आणि आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी ही माहिती दिली.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती आणि निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील या आयोगाची पहिली बैठक २८ ऑक्टोबर रोजी झाली. या बैठकीत चौकशीची प्रक्रिया निश्चित करण्यात आली.

आयोगाने सुनावणी खुल्या पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. या कामकाजाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या व्यक्तींना उपस्थित राहता येईल; मात्र त्यांना कामकाजात हस्तक्षेप करता येणार नाही, असे मुंढे यांनी सांगितले. निष्पक्ष, न्याय्य आणि पारदर्शक चौकशी सुनिश्चित करणे हा यामागील उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या आरोपांनंतर ही चौकशी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे पुण्यात एमपीएससीच्या उमेदवारांनी सलग ११ दिवस आंदोलन केले होते. त्याचे परिणाम राज्यात उमटले. या गैरप्रकारांना जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्यासह संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी उमेदवारांनी केली होती.

विशेषतः २०२५ मधील औषध निरीक्षक परीक्षेच्या भरती प्रक्रियेवरही या वादामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

प्रश्नपत्रिका, उत्तरतालिका किंवा त्यांमधील काही भाग कथितरीत्या फुटल्याच्या प्रकरणांची आयोग चौकशी करणार आहे.

तसेच एमपीएससीचे विद्यमान आणि माजी अध्यक्ष व सदस्यांची भूमिका तपासली जाणार आहे. परीक्षांमधील अनियमिततेसाठी कोण जबाबदार आहे आणि संबंधितांवर पुढील कारवाई करण्याची आवश्यकता आहे का, याचाही आयोगाकडून आढावा घेतला जाईल.

या परीक्षांशी संबंधित माहिती असलेल्या उमेदवारांना, विद्यार्थ्यांना, व्यक्तींना आणि नोंदणीकृत संस्थांना आयोगाने १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्रे सादर करण्याचे आवाहन केले आहे. संबंधित प्रतिज्ञापत्रे मराठी किंवा इंग्रजी भाषेत सादर करता येतील. त्यासोबत वैध ओळखपत्र आणि संबंधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

या कागदपत्रांच्या प्रती complaints.enquirycom.mpc@maharashtra.gov.in या ई-मेल पत्त्यावरही पाठवाव्यात, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पष्ट केले आहे.



नऊ परीक्षांची चौकशी

आयोगाच्या तपासणीच्या कक्षेत खालील परीक्षांचा समावेश आहे :

- औषध निरीक्षक परीक्षा (गट-ब).
- महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा आणि मुख्य परीक्षा.
- महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा आणि मुख्य परीक्षा.
- महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा.
- अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा.
- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा.
- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा.

उच्च न्यायालयाचा निर्वाळा

जमीन वादात खरेदीदारांवर अन्याय होऊ देणार नाही

मुंबई : विशिष्ट जमिनीवर कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित नसल्याचे पाहून अनेक निष्पाप लोक जमिनी खरेदी करतात. अशा प्रकरणांत जमिनीच्या खटल्यात खरेदीदारांना ओढून त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. ३१ वर्षे प्रलंबित दाव्यात दुरुस्तीचा अर्ज फेटाळताना न्यायालयाने हा निर्वाळा दिला आणि वडगाव मावळ दिवाणी न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

जमीन वादाशी संबंधित अत्यंत जुन्या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठापुढे झाली. याचिकाकर्त्या सुभद्राबाई काटे यांनी उच्च न्यायालयात दावा दुरुस्तीचा अर्ज केला होता. हा अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला. खटला गेल्या ३१ वर्षांपासून प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत केवळ अंतिम तडजोडीसाठी खरेदीदारांना अडकवण्याच्या उद्देशाने दुरुस्तीसाठी अर्ज केल्याचे दिसून येत आहे, असे निरिक्षण न्या. मारणे यांनी नोंदवले आणि खरेदीदारांवर अन्याय होऊ देणार नसल्याचे स्पष्ट करीत दावा दुरुस्तीचा अर्ज फेटाळला. पुण्यातील वडगाव मावळ येथील जमीन गट क्र. ५८३ आणि ६१२ च्या मालकी हक्काबाबत सुभद्राबाई काटे यांनी १९९५ मध्ये दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. हा खटला चालू असताना २०१७ मध्ये त्यांनी अर्जात दुरुस्ती करून गट क्र. ६१२ ऐवजी गट क्र. ६०२ असा बदल करण्याची आणि २००६ ते २००८ दरम्यान झालेल्या खरेदीखतांना आव्हान देण्याची मागणी केली.

एनसीएमसी कार्ड नोंदणीचे आवाहन

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सवलत धारक प्रवाशांना विविध सवलतींचा लाभ मिळण्यासाठी राष्ट्रीय सामान्य वाहतूक कार्ड एनसीएमसी नोंदणीला गती देण्याचे आवाहन महामंडळाने केले आहे. महिला प्रवाशांनी नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत एनसीएमसी कार्डची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

एसटी महामंडळातील सर्व सवलतधारक प्रवाशांना प्रवासभाड्यातील सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी कार्ड उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी एसटी आगार, बसस्थानके तसेच प्रवाशांच्या सोयीच्या ठिकाणी अधिकृत एजन्सीच्या माध्यमातून कार्ड नोंदणी व वितरणाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अधिकृत केंद्रांवर सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत ही प्रक्रिया सुरू असते.

महिला प्रवाशांना सवलतीचा लाभ घेण्यात अडचणी येऊ नयेत, यासाठी नोव्हेंबरअखेर कार्ड नोंदणी पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारकांपर्यंत ही सुविधा पोहोचविण्यासाठी पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयांच्या माध्यमातून विशेष नोंदणी व वितरण शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरांचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

मनपा आयुक्त अश्विनी भिडे यांचे निर्देश

छठपूजेसाठी एक खिडकी योजना

मुंबई : मुंबईत छठपूजेच्या उत्सवासाठी मुंबई महानगरपालिकेने विशेष नियोजन करावे. यासाठी छठपूजेदरम्यान भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गुरुवारी महापालिका आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला २० हून अधिक छठपूजा समित्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी विविध सूचना आणि मागण्या मांडल्या. त्यानुसार आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले.



छठपूजा हा श्रद्धेचा आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा उत्सव आहे. मुंबई महानगरपालिकेने छठपूजा स्थळांवर कृत्रिम तलाव, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी सुविधा द्याव्यात. तसेच, एक खिडकी योजनेद्वारे परवानग्यांची प्रक्रिया सुलभ करून भाविकांची गैरसोय टाळावी.

मुंबईची सर्वसमावेशक संस्कृती जपत छठपूजा उत्सव सुरक्षित आणि उत्साहात नक्कीच पार पडेल, असा विश्वास कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

मुंबईतील मढ-मार्वे, जुहू चौपाटी, गिरगाव चौपाटी, दादर चौपाटी आणि बाणगंगा येथे छठपूजेसाठी मोठ्या संख्येने भाविक एकत्र येतात. जुहू चौपाटीवर सुमारे पाच लाख भाविक छठपूजेसाठी उपस्थित राहत असल्याने तेथे पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. सार्वजनिक स्वच्छतागृहे, कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोल्या, पिण्याचे पाणी तसेच इतर मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यावर समित्यांच्या प्रतिनिधींनी भर दिला.

vedanta power

VEDANTA POWER LIMITED

(Formerly known as Talwandi Sabo Power Limited)

Registered Office: Vedanta Power Limited, C-103, Atul Projects, Corporate Avenue, New Link Road, Chakala, Andheri (E), Chakala MIDC, Mumbai, Maharashtra, India, 400093
Website: www.vedantapower.com | CIN : L40101MH2007PLC433557

EXTRACT OF UNAUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED 30 SEPTEMBER 2026

Quarterly Revenue of ₹2,908 Crores, growth up 38% YoY First ever positive EPS

Highest-ever profit growth turnaround, with Q2 PAT before exceptional items rising 171% YoY to ₹ 101 Crores

Highest-Ever Quarterly Performance EBITDA Soars by Record 122%

Net Debt/EBITDA improves to 4.47x in Q2 FY27 compared with 9.82x in Q2 FY26

(₹ in Crore, except as stated)

S. No.	Particulars	Quarter ended 30.09.2026 (Unaudited)	Quarter ended 30.06.2026 (Unaudited)	Quarter ended 30.09.2025 (Unaudited)	Half Year ended 30.09.2026 (Unaudited)	Half Year ended 30.09.2025 (Unaudited)	Year ended 31.03.2026 (Unaudited)
1.	Revenue from operations	2,908	2,607	2,104	5,515	4,090	8,799
2.	Net profit/(loss) for the period (before exceptional items, taxes)	102	(121)	(190)	(19)	(88)	53
3.	Net profit/(loss) for the period after exceptional items	79	(608)	(2,257)	(529)	(2,155)	(2,271)
4.	Net (loss)/profit after taxes	83	(423)	(1,689)	(340)	(1,601)	(1,686)
5.	Total comprehensive income [comprising profit/(loss) (after tax) and other comprehensive income (after tax)]	83	(423)	(1,688)	(340)	(1,600)	(1,688)
6.	Paid-up equity share capital (Face value of ₹ 10 each)	3,911	3,911	-	3,911	-	-
7.	Earnings per share - Basic/Diluted#	0.21	(1.08)	(4.32)	(0.87)	(4.09)	(4.31)
8.	Net worth (Total equity)	13,179	13,077	12,885	13,179	12,885	13,423
9.	Outstanding debt	8,507	8,834	8,421	8,507	8,421	8,466
10.	Debt Equity Ratio (in times)#	0.65	0.68	0.65	0.65	0.65	0.63
11.	Debt Service Coverage Ratio (in times)#	1.14	0.80	0.54	0.97	0.86	0.96
12.	Interest Service Coverage Ratio (in times)#	1.81	1.28	0.90	1.55	1.40	1.81

Notes:

a) Additional information on standalone financial results is as follows:

S. No.	Particulars	Quarter ended 30.09.2026 (Unaudited)	Quarter ended 30.06.2026 (Unaudited)	Quarter ended 31.03.2026 (Unaudited)	Half Year ended 30.09.2026 (Unaudited)	Half Year ended 30.09.2025 (Unaudited)	Year ended 31.03.2026 (Unaudited)
1.	Revenue from operations	2,066	1,836	1,740	3,902	3,465	7,295
2.	Profit/(loss) before tax	51	(628)	(2,204)	(577)	(2,108)	(2,142)
3.	Profit/(loss) after tax	51	(449)	(1,641)	(397)	(1,566)	(1,580)
4.	Total comprehensive income [comprising (loss)/profit (after tax) and other comprehensive income (after tax)]	51	(449)	(1,640)	(397)	(1,565)	(1,582)
5.	Net worth (Total equity)	8,629	8,559	8,315	8,629	8,315	8,930
6.	Outstanding Debt	7,495	7,825	7,519	7,495	7,519	7,466
7.	Debt Equity Ratio (in times)#	0.87	0.91	0.90	0.87	0.90	0.84
8.	Debt Service Coverage Ratio (in times)#	0.94	0.52	0.52	0.73	0.86	1.09
9.	Interest Service Coverage Ratio (in times)#	1.57	0.88	0.91	1.23	1.50	1.88

Not annualised, except for the year ended 31 March 2026.

b) The above consolidated results of Vedanta Power limited ("the Company") and its subsidiary ("the Group"), for the quarter and six months ended 30 September 2026 have been reviewed by the Audit and Risk Management Committee and approved by the Board of Directors in their respective meetings held on 29 October 2026. The limited review, as required under Regulations 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, has been completed by the statutory auditors for the quarter and six months ended 30 September 2026, and they have expressed an unmodified conclusion on the aforesaid results.

c) The Hon'ble National Company Law Tribunal (NCLT), Mumbai Bench, vide its order dated 9 January 2026, approved the Scheme of Arrangement ("the Scheme") for the demerger of the Power undertaking of Vedanta Limited ("Demerged undertaking") into the Company on a going concern basis.

Additionally, as part of the overall reorganisation, Vedanta Limited has also transferred its shareholding in Meenakshi Energy Limited to VPL.

The Scheme became effective on 1 May 2026 ("effective date"), which is also the Appointed Date of the Scheme. Consequent to the scheme becoming effective, the Power division of Vedanta Limited was transferred to and vested in the Company and has been accounted for in accordance with the accounting treatment prescribed under the Scheme and the applicable provisions of Ind AS. The assets, liabilities and share based payment reserve pertaining to the Demerged Undertaking have been recognised in the books of the Company at carrying value pursuant to the Scheme.

Pursuant to the Scheme, the Company issued 1 equity share of face value ₹10 each, fully paid-up, for every 1 equity share of face value ₹1 each, fully paid-up, held by the shareholders of Vedanta Limited as on the Record Date of 1 May 2026 ("Share Entitlement Ratio"). Accordingly, the Board of Directors of the Company at its meeting held on 20 April 2026, allotted 3,91,03,88,057 (nos.) equity shares having face value of ₹ 10/ each were allotted by the Company to the shareholders of Vedanta Limited, as on the record date i.e., 1 May 2026, in accordance with the approved share entitlement ratio and the Company ceased to be a subsidiary of Vedanta Limited. Further, pursuant to the applicable regulatory approvals, the equity shares of the Company were listed and admitted to trading on BSE Limited and the National Stock Exchange of India Limited on 15 June 2026.

d) Earnings per share (Basic and Diluted) are calculated after considering the impact of issuance of equity shares pursuant to the Scheme from the beginning of the earliest period presented.

e) The figures for the comparative periods have been presented as if the Scheme (refer Note (c) above) had become effective from 1 April 2025, in accordance with the accounting treatment prescribed under the Scheme. Accordingly, the figures for the quarter and six months ended 30 September 2025 and year ended 31 March 2026 include the consolidated results of the Company, its subsidiary and the Demerged Undertaking transferred pursuant to the Scheme.

f) The above is an extract of the detailed format of the financial results for the quarter and six months ended 30 September 2026 filed with the Stock Exchanges under Regulations 33 and 52, as applicable, of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results are available on the websites of Stock Exchanges, www.nseindia.com, www.bseindia.com and on the Company's website https://www.vedantapower.com

Place: New Delhi
Date: 29 October 2026

SCAN THE QR CODE TO VIEW THE FULL RESULTS

For and on behalf of the Board of Directors
Rajinder Singh Ahuja
Whole Time Director and Chief Executive Officer